# महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

फोन नं. २४०७७४४१
ग्रामः- पर्सनग्रीड, मुंबई
फॅक्स : २४०२५७६३

एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळमजला, प्लॉट नं.३१,धारावी रोड,
माटुंगा, मुंबई - ४०० ०१९.
साप्रवि / मावक /मा.जाती/

## प्रशासकीय परिपत्रक क्र.१३४ दिनांक २९-११-२००७

**विषयः** राज्य मागासवर्ग आयोगाने शासनास सादर केलेल्या अहवाल क्रमांक १३ ते १६ नुसार राज्याच्या इतर मागासवर्ग, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गाच्या यादीमध्ये नव्याने जाती समाविष्ट करणे व वगळणेबाबत.

महाराष्ट्र राज्य शासन निर्णय क्रं. - सीबीसी १४ / २००५ / प्र.क्र. ८२ / मावक - ५ दि. ०१/ ०३/ २००६ अन्वये राज्य मागासवर्ग आयोगाने शासनास सादर केलेल्या १३ ते १६ अहवालातील आयोगाच्या शिफाराशीनुसार खालील इतर मागासवर्ग विशेष मागासवर्ग व भटक्या जमातीच्या यादीमध्ये सोबत जोडलेल्या शासन निर्णयात नमूद केलेल्या जातीचा / तत्सम जातीचा समावेश करण्यास / वगळण्यास मान्यता दिली आहे.

सदर शासनाच्या निर्णयाची अंमलबजावणी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीमध्ये करण्यासाठी सदर शासन निर्णयाची प्रत माहिती व उचित कार्यवाहीसाठी सोबत जोडलेली आहे.

सोबत : शासन निर्णय क्र. सीबीसी - १४ / २००५ प्र. क्र. ८२ /
मावक -५ दि. ०१/ ०३/ २००६

मुख्य महाव्यवस्थापक (तां.आ.)

प्रति,

म.रा.वि.वितरण कंपनी मर्यादित,

कार्यकारी अभियंता यांचे स्तरापर्यंत प्रेषण यादीनुसार.

राज्य मागासवर्ग आयोगाने शासनास सादर केलेल्या अहवाल क्रमांक १३ ते १६ नुसार राज्याच्या इतर मागासवर्ग, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गाच्या यादीमध्ये नव्याने जाती समाविष्ट करणे व वगळणेबाबत....

# महाराष्ट्र शासन

सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय क्रमांक- सीबीसी-१४/२००५/प्र.क्र.८२/मावक-५,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : १ मार्च, २००६

वाचा:-
१. शासन निर्णय, शिक्षण व समाजकल्याण विभाग, क्रमांक- सीबीसी-१२६९/म, दिनांक २१ नोव्हेंबर, १९६१
२. शासन निर्णय, शिक्षण व समाजकल्याण विभाग, क्रमांक- सीबीसी-१४६७/म, दिनांक १३ ऑक्टोबर १९६७,
३. शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, क्रमांक- सीबीसी १०९४/प्र.क्र. २३६/मावक-५, दिनांक १३ जून, १९९५
४. शासन निर्णय, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि विशेष मागासप्रवर्ग कल्याण विभाग, क्रमांक- सीबीसी १०९८/प्र.क्र. १८५/इमाव-५, दिनांक १ जानेवारी, २००१
५. शासन निर्णय, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि विशेष मागासप्रवर्ग कल्याण विभाग, क्रमांक- सीबीसी १०९८/प्र.क्र. १८५/इमाव-५, दिनांक १४ फेब्रुवारी, २००१
६. शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक- सीबीसी.१४/२००१/प्र.क्र.२३२/मावक-५, दिनांक १ जून, २००४
७. शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक- सीबीसी.१४/२००१/प्र.क्र.२३२/मावक-५, दिनांक २ जून, २००४
८. समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा विभाग, क्रमांक- सीबीसी.१०९१/२०८४८/(१७१)/मावक-५, दिनांक २४ सप्टेंबर, १९९१ चे शासन पत्र.
९. सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक- सीबीसी-१०/२००२/प्र.क्र.१११/मावक-५, दिनांक २८ सप्टेंबर, २००४ चे शासन पत्र.
१०. राज्य मागासवर्ग आयोगाचे पत्र क्रमांक-समाआपु/गोप.अ.६-१३/लोणारी लो/०४-०५, दिनांक ४.२.२००५
११. राज्य मागासवर्ग आयोगाचे पत्र क्रमांक-समाआपु/गोप.अ.६-१६/१३ प्रकरणे/०५-०६/७१२, दिनांक १८.८.२००५

**प्रस्तावना :** विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गाच्या याद्या शासनाने वरील अनुक्रमांक १, २, ३ या शासन निर्णयान्वये प्रसिध्द केल्या आहेत व त्यात वेळोवेळी सुधारणाही करण्यात आलेल्या आहेत. मा. सर्वोच्च न्यायालयाने इंद्रा सहानी व इतर विरुध्द भारत सरकार व इतर यामध्ये दिलेल्या निर्णयानुसार इतर मागासवर्गाच्या यादीमध्ये समावेश करण्यासाठी व वगळण्यासाठी आलेल्या

मागण्या व तक्रारीबाबत तपासणी आणि शिफारस करण्यसाठी शासनाने राज्य मागासवर्ग आयोग गठीत के. आहे. या आयोगाने यापूर्वीच शासनास सादर केलेल्या अहवालातील शिफारशींनुसार वरील जातींच्या यादीमध्ये सुधारणा करण्यात आली आहे. राज्य मागासवर्ग आयोगाने सन २००५ व २००६ मध्ये शासनास सादर केलेल्या १३ ते १६ अहवालातील शिफारशींनुसार काही जातींचा समावेश भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गांच्या यादीमध्ये करणे व काही जातींना इतर मागासवर्गांच्या यादीतून वगळण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :** राज्य मागासवर्ग आयोगाने शासनास सादर केलेल्या १३ ते १६ अहवालातील आयोगाच्या शिफारशींनुसार खालील "अ" व "ब" येथील जातीचा / तत्सम जातींचा इतर मागासवर्गांच्या यादीमध्ये समावेश करण्यास, "क" येथील जाती / तत्सम जातींचा विशेष मागास प्रवर्गाच्या यादीमध्ये समावेश करण्यास, "ड" येथील जाती / तत्सम जमातींचा भटक्या जमातीच्या यादीमध्ये समावेश करण्यास व "इ" येथील जाती तत्सम जाती इतर मागासवर्गाच्या यादीतून वगळण्यास शासना मान्यता देत आहे.

**अ) राज्य मागासवर्ग आयोगाने शासनास केलेल्या शिफारशीनुसार खालील जातींचा नव्याने इतर मागास वर्गीयांच्या यादीमध्ये समावेश करण्यात येत आहे.**

| अ. क्र. | जातींचे नांव |
|---|---|
| ३४० | मुलाणा, मुलाणी, मुलाणे |
| ३४१ | ईस्ट ईंडियन, ईस्ट ईंडियन ख्रिश्चन, ईस्ट ईंडियन कॅथॉलिक |

**ब) राज्य मागासवर्ग आयोगाने केलेल्या शिफारशीनुसार खालील तत्सम उपजातींचा इतर मागास वर्गीयांच्या यादीतील मूळ जातीसमोर समावेश करण्यात येत आहे.**

| अ.क्र. | इतर मागासवर्ग प्रवर्गातील मूळ जात व अनुक्रमांक | नव्याने समावेश करण्यात आलेली तत्सम जात / उपजात व तिच्या मूळ जातीचा अनुक्रमांक |
|---|---|---|
| १ | कुंभार - ८२ | कुंबारा, कुंभारा, कुलाला, मुल्या - ८२ |
| २ | दोडेगुजर - ३२६ | गुजर, लेवे गुजर, रेवे गुजर, रेवा गुजर, सुर्यवंशी गुजर - ३२६ |
| ३ | पांचाळ - २६६ | पंचाल - २६६ |
| ४ | पाटकर - १२६ | सोमवंशीय सहस्त्रार्जून क्षत्रिय, पटवेकरी, पटवेगार, पटेगार, पट्टेगार, पटवी, क्षत्रिय पाटकर - १२६ |
| ५ | सुतार - १७४ | सुथार - १७४ |
| ६ | शिंपी - १५३ | जैन शिंपी, श्रावक शिंपी, शेतवाळ, शेतवाल, सेतवाळ, सेतवाल - १५३ |
| ७ | कुलेकडगी - ३३८ | कुल्लेकडगी, कुलाकडगी, कुल्लाकडगी - ३३८ |
| ८ | भडभूंजा - १६ | भूजवा, भूंजवा, भूर्जी, भरडभूंजा, भूरंजी, भूंज - १६ |
| ९ | पावरा, पवरा- १८९ | भोयर, भोइर, भोयीर - १८९ |

**क) राज्य मागासवर्ग आयोगाने केलेल्या शिफारशीनुसार खालील तत्सम / उपजातींचा विशेष मागास प्रवर्गाच्या यादीमध्ये मूळ जाती समोर नव्याने समावेश करण्यात येत आहे.**

| अ.क्र. | विशेष मागास प्रवर्गातील मूळ जात व अनुक्रमांक | नव्याने समाविष्ट करण्यात आलेली तत्सम जात व मूळ जातीचा अनुक्रमांक |
|---|---|---|
| १ | अनुक्रमांक ३ (९) - पद्मशाली | वेनेवार, वनेवार, वन्नेवार - ३ |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | अनुक्रमांक ३ (४) - साळी | स्वकुळ साळी | - ३ (४) |

ड) राज्य मागासवर्ग आयोगाने केलेल्या शिफारशींनुसार खालील जातींचा/ तत्सम जातींचा भटक्या जमातींच्या यादीमध्ये समावेश करण्यात येत आहे.

| अ.क्र. | भटक्या जमातीच्या यादीतील अनुक्रमांक | नव्याने समाविष्ट केलेल्या तत्सम जाती / उपजाती व अनुक्रमांक |
|---|---|---|
| १ | अ.क्र. ८ - लोहार (नव्याने समावेश) | गाडी लोहार, घिसाडी लोहार, घिसाडी, चितोडी लोहार, राजपूत लोहार, पांचाळ लोहार, खाती, खातवाढी, जिनगर |
| २ | अ.क्र. २१ - सिक्कलगार | शिकलीगार, शिकलगार, शिकीलगार, शिकलीगर, शिकलीकर, सिकलकर, सिकलीकर, सिकलीघर, शिकलीगर, सिकलीगर, सिकलगर, सिक्कलीगर, सायकलगर, सैकलकर, सैकलगर, सिक्कलकर, शिकलकर, सिकिलकर, शिकलकरी, |

इ) राज्य मागासवर्ग आयोगाने केलेल्या शिफारशींनुसार खालील जातींना इतर मागासवर्गातून वगळण्यात येत आहे.

| अनुक्रमांक | इतर मागासवर्गाच्या यादीतून खालील अनुक्रमांकावरील वगळण्यात आलेल्या जातीचे नाव |
|---|---|
| १ | अ.क्र. १५१ - स्वकुळ साळी |
| २ | अ.क्र. ९२ व ३१३ - लोहार |
| ३ | अ.क्र. ५९ - जिनगर |
| ४ | अ.क्र. ३१४ - शिकलगार |

२. शासन पत्र क्रमांक - सीबीसी १०९१/२०८४८/(१७१)/मावक-५, दिनांक २४ सप्टेंबर, १९९१ व क्रमांक- सीबीसी १०/२००२/प्र.क्र.१११/मावक-५, दिनांक २८ सप्टेंबर, २००४ च्या पत्रांन्वये गुजर व काही जातींचा तपासणी अहवाल प्राप्त होईपर्यन्त त्या जातींना जातीचे प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र देण्याबाबत शासनाने आदेश दिलेले होते. आयोगाचा प्राप्त अहवालानुसार उपरोक्त **"ब (२)"** नुसार इतर मागासवर्गाच्या यादीत ३२६ वर **"दोडेगुजर"** या जातीसमोर तत्सम जाती म्हणून नव्याने **"गुजर, लेवे गुजर, रेवे गुजर, रेवा गुजर, सुर्यवंशी गुजर"** या जातींचा समावेश करण्यात आलेला असल्याने वर उल्लेखिलेले दिनांक २४ सप्टेंबर, १९९१ चे पत्र, दिनांक २८ सप्टेंबर,२००४ चे पत्र व त्याअनुषंगाने निर्गमित झालेली इतर पत्रे या निर्णयानुसार रद्द करण्यात येत आहेत.

३. राज्य मागासवर्ग आयोगाच्या शिफारशींनुसार नव्याने भटक्या जमाती, इतरमागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गामध्ये नव्याने समाविष्ट केलेल्या जाती / जमाती / तत्सम जातींना शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून जातीचे देय असलेले फायदे लागू होतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने

(बलदेव चंद)
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

राज्यपालांचे सचिव,

मुख्यमंत्र्यांचे सचिव.
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग,
महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
मुख्य महानगर दंडाधिकारी,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हा दंडाधिकारी,
सर्व उप विभागीय अधिकरी ( महसूल)
तथा उप विभागीय दंडाधिकारी,
सर्व तालुका कर्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार,
प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा, मुंबई,
प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा खंडपीठ - नागपूर,
प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा खंडपीठ - नागपूर,
प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा खंडपीठ- औरंगाबाद,
प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा खंडपीठ - औरंगाबाद,
संचालक समाजकल्याण/ विजाभज, महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, उच्च व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
संचालक, माध्यमिक शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
संचालक, प्राथमिक शिक्षण ,महाराष्ट्र राज्य, पुणे,
संचालक, आदिवासी कल्याण, महाराष्ट्र राज्य, नाशिक,
संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे,
सदस्य सचिव, राज्य मागासवर्ग आयोग, पुणे,
सर्व मंत्रालयीन विभाग,

**त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख यांना ह्याबाबतच्या सूचना द्याव्यात.**

सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी/ सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे समाजकल्याण अधिकारी,
जिल्हा समाजकल्याण अधिकारी, बृहन्मुंबई/ मुंबई उपनगरे,
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
निवड नस्ती, का- मावक-५

भटक्या जमातीतील लोहार या जातीच्या व्यक्तींना जातीची प्रमाणपत्रे देणेबाबत व त्या प्रमाणपत्रांची तपासणी करणेबाबत

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक-सीबीसी २००६/प्र.क्र.१९५/मावक-५
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२
दिनांक : १५ जून, २००६

परिपत्रक :- लोहार ही जात इतर मागासवर्गाच्या यादीमध्ये अनुक्रमांक १२/३१३ वर समाविष्ट केली होती. तथापि राज्य मागासवर्ग आयोग, पुणे यांनी शासनास सादर केलेल्या अहवालातील शिफारशीनुसार लोहार ही जात इतर मागासवर्गाच्या यादीतून वगळून ती आता [illegible] भटक्या जमातीच्या यादीमध्ये अनुक्रमांक ८ वर लोहार ही मुख्य जात समाविष्ट केली असून तीच्या तत्सम जाती म्हणून गाडी लोहार, घिसाडी लोहार, घिसाडी, चितोडी लोहार, रजपूत लोहार, पांचाळ लोहार, खाती, घातवाढी, जिनगर इत्यादिंचा समावेश केला आहे. लोहार जातीच्या विद्यार्थ्यांच्या शाळा सोडल्याच्या दाखल्यांमध्ये गाडी लोहार, पांचाळ लोहार अशा नोंदी आढळतात व अशा विद्यार्थ्यांच्या वडिलांच्या संबंधीत कागदपत्रांमध्ये लोहार/हिंदु लोहार अशा नोंदी आढळतात. त्यामुळे लोहार जातीच्या मुलांना/उमेदवारांना जातीची प्रमाणपत्रे मिळण्यास अडचणी निर्माण झालेल्या आहेत. याकरिता असे स्पष्ट करण्यात येते की, लोहार जातीच्या ज्या विद्यार्थ्यांच्या/ उमेदवारांच्या शाळा सोडल्याच्या दाखल्यामध्ये गाडी लोहार, पांचाळ लोहार अशा नोंदी आहेत. अशा विद्यार्थ्यांच्या/उमेदवारांच्या किंवा त्यांच्या वडिलांच्या स्वतःच्या रक्त नात्यातील व्यक्तींच्या जातीच्या नोंदी ज्या कागदपत्रामध्ये घेतल्या आहेत, त्या कागदपत्रामध्ये हिंदु लोहार/लोहार अशा नोंदी असल्यास, त्यांना लोहार म्हणून भटक्या जमातीचे प्रमाणपत्र देण्यास हरकत नसावी. लोहार म्हणून भटक्या जमातीचे

(6)

... प्रमाणपत्र मिळविलेल्या विद्यार्थ्यांचे/उमेदवाराचे प्रमाणपत्र तपासणीसाठी संबंधीत जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे तपासणीसाठी प्राप्त झाल्यानंतर ते तपासतांना वरील सूचना समितीने विचारांत घ्याव्या.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २००६०६१५१३०८५६००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(ना. ना. शडीकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग,
महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
मुंबई महानगर दंडाधिकारी,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हा दंडाधिकारी,
सर्व उप विभागीय अधिकारी (महसूल)
तथा उप विभागीय दंडाधिकारी,
सर्व तालुका कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार,
प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा, मुंबई,
प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा खंडपीठ - नागपूर,
प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा खंडपीठ - नागपूर,
प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा खंडपीठ- औरंगाबाद,
प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा खंडपीठ - औरंगाबाद,
संचालक समाजकल्याण/ विजाभज, महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, उच्च व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
संचालक, माध्यमिक शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
संचालक, प्राथमिक शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,

संचालक, आदिवासी कल्याण, महाराष्ट्र राज्य, नाशिक.
संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे,
सदस्य सचिव, राज्य मागासवर्ग आयोग, पुणे.
सर्व मंत्रालयीन विभाग,

त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख यांना ह्याबाबतच्या सूचना द्याव्यात.

सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी/ सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे समाजकल्याण अधिकारी,
जिल्हा समाजकल्याण अधिकारी, बृहन्मुंबई/ मुंबई उपनगरे,
महा संचालक, माहिती व जनसंपर्क महा संचालनालय, मंत्रालय, मुंबई,
निवड नस्ती, का- मावक-५